ePaper “बोलघेवडेपणा करुन जनतेच्या डोळ्यांत धूळफेक..”, मुख्यमंत्री शिंदेंचं आदित्य ठाकरेंना उत्तर



| वर्ष - 7 । अंक - 247 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- इंग्लंडचा बेन डकेत घाबरला!
- श्रुतीच्या फोटोमध्ये धर्मेंद्र?
- आप आणि काँग्रेसचा दिल्ली फॉर्म्युला
- सरकारच्या पैशांवर शिंदेंची सहल

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 16 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## कोविड काळात 435 कोटींची कामाई केल्याचा आरोप

# पवार परिवार विरुद्ध सोमय्या!

।पुणे। महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी।

**कोरोना काळात पुण्यातील सिरम इन्स्टिट्युटने पवार कुटुंबियांशी संबंधित असलेल्या निओ स्टार इन्फ्रा प्रोजेक्ट लि. कंपनीच्या खात्यावर 435 कोटी रूपये टाकले आहेत. कंपनीची एक लाखाची गुंतवणूक असताना 435 कोटी कशाचे टाकले, हे कमिशन आहे का, कोरोना काळात पवार कुटुंबियांनी 435 कोटी रूपयांची कमाई केल्याचा आरोप भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला.**

## » लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजप अन् राष्ट्रवादीत नवा वाद




> ज्या-ज्या माझ्या तक्रारी झाल्या. त्यामध्ये 100 टक्के तथ्य आढळले. मंत्री हसन मुश्रीफ यांचे प्रकरण न्यायालयात चालू आहे. पुढच्या निर्णय न्यायालयाने घेणे अपेक्षित आहे. न्यायालयापर्यंत पोहचविण्याचे माझे काम आहे. खासदार भावना गवळी यांच्या सव्वा आठ कोटींची आयकर विभागाने मालमत्ता अँटॅच केली.
>
> - किरीट सोमय्या, माजी खासदार, भाजपा.

सोमय्या यांनी आकुर्डीतील कंपनी नोंदणी कार्यलयाला आज सोमवारी भेट दिली. यावेळी आमदार अश्विनी जगताप, सदाशिव खाडे, अमित गोरखे, नामदेव ढाके, राजू दुर्गे आदी उपस्थित होते.

सोमय्या म्हणाले की, शरद पवार यांचे बंधू प्रताप पवार यांनी एक कंपनी उभारली. त्यातून एक पैशांची उलाढाल न करता 435 कोटी रूपयांची कमाई केली. प्रताप पवार यांच्या निओ स्टार इन्फ्रा प्रोजेक्ट लि. कंपनीला हे पैसे मिळाले आहेत. याचा पाठपुरावा करण्यासाठी उद्या दिल्लीत उच्च अधिका-यांची भेट घेणार आहे. 2022 पर्यंत बॅलन्सशीट पाहिले आहेत. तोपर्यंत कोणतेही व्यवहार झाले नव्हते.

मार्च 2021 मध्ये 435 कोटी सिरम इन्स्ट्यूटने प्रताप पवार यांच्या कंपनीला 6 टक्के रेडिमेबल पेप्रर्स शीट म्हणजे कंपनीला द्यायची इच्छा झाली तर व्याज द्यायचा या प्रमाणे दिले आहेत. 2021 आणि 2022 मध्ये एक दमडीचेही व्याज देण्यात आले नाही. 435 कोटीपैकी 300 कोटी प्रताप पवार यांनी दुस-या कंपनीत वळविले आहेत. याची पूर्ण चौकशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भारत सरकारचे कंपनी मंत्रालय, अंमलबजावणी संचनालय, आयकर विभागाने करावी, ही पवार परिवाराने वसुली केली आहे.हे प्रकरण बाहेर काढल्यानंतर पवार परिवाराने 100 कोटींचा दावा ठोकण्याची मला धमकी दिली. 435 कोटींचा हिशोब द्या. या वसुलीचा जाब पवार परिवाराला द्यावा लागणार, असेही ते म्हणाले.




## » वाहनचालकांनो, दुचाकीचा नंबर चारचाकीसाठी राखून ठेवण्याची संधी

# दुचाकींसाठी नोंदणी क्रमांकाची आता नवीन मालिका!

।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी ‘एलएच’ ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक दुचाकींसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**

नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी 17 जानेवारी रोजी सकाळी 11 ते दुपारी 2.30 वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी 18 जानेवारी रोजी सकाळी 11 ते दुपारी 2.30 वा. विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी ‘डी.वाय. आर.टी.ओ., पिंपरी चिंचवड’ यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या



पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

# विद्यापीठांचे दरवाजे गरिबांना बंद!

## विद्यापीठातील प्रवेशासाठी शिष्यवृत्ती न zदेण्याची तरतूद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारने राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना खासगी विद्यापीठांचे दरवाजे बंद करणारे विधेयक पारित केले आहे. या विधेयकानंतर आता खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्य सरकारने जूनमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील १० टक्के विद्यार्थ्यांना ५० टक्के शुल्क सवलत देण्याचा निर्णय घेतला होता.**




त्यानंतर आता हे विधेयक पारित करण्यात आले आहे. आमदार कपिल पाटील यांनी या बाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली. राज्य अध्यक्ष अतुल देशमुख, छात्रभारतीचे रोहित ढाले, सूरज पंडित, स्टुडंट हेल्पिंग हँडचे कुलदीप आंबेकर, नीलेश निंबाळकर या वेळी उपस्थित होते.गेल्या काही वर्षांमध्ये राज्यात खासगी विद्यापीठांची संख्या वाढत आहे. नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खासगी विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण आणि सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधेयकाबाबतची माहिती, तपशील दिला नाही. या विधेयकावर विधानसभेत कोणतीही चर्चा न होता ते मंजूर करण्यात आले, तर विधानपरिषदेतही अशाच पद्धतीने गदारोळात मांडून मंजूर करण्यात आले. या विधेयकामधील तरतुदी विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच हे विधेयक समाजात पोहोचलेले नसल्याने त्याच्या परिणामांची कल्पना आलेली नाही. मात्र, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचा भार सरकारवर आणि खासगी विद्यापीठांवर पडू नये, यासाठीचे हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. या विधेयकामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्यातील कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरूनच शिक्षण घ्यावे लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षीपासून या विधेयकाचे चटके बसणार आहेत. खासगी विद्यापीठांचे शुल्क भरमसाठ असल्याने, मध्यमवर्गीय, गरीब आणि आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणच घेता येणार नाही. खासगी विद्यापीठांचा सरकारवर दबाव आहे. तसेच सरकारला जबाबदारीतून अंग काढून घ्यायचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महाविद्यालये बंद केली जाणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.खासगी विद्यापीठांबाबत विधानसभा आणि विधान परिषदेत पारित झालेल्या विधेयकावर राज्यपालांनी स्वाक्षरी केल्यावर त्याचे रुपांतर होणार आहे. त्यामुळे राज्यपालांनी विधेयक परत पाठवावे, यासाठी विनंती करण्यासह या विधेयकाची राज्यभरात विविध ठिकाणी होळी केली जाणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. या विधेयकामधील तरतुदी विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच हे विधेयक समाजात पोहोचलेले नसल्याने त्याच्या परिणामांची कल्पना आलेली नाही. मात्र, राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचा भार सरकारवर आणि खासगी विद्यापीठांवर पडू नये, यासाठीचे हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे.

### राज्यपालांनी विधेयक परत पाठवावे

» या विधेयकामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वित्तीय सहाय्य, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती मिळणार नाही. राज्यातील कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरूनच शिक्षण घ्यावे लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षीपासून या विधेयकाचे चटके बसणार आहेत. खासगी विद्यापीठांचे शुल्क भरमसाठ असल्याने, मध्यमवर्गीय, गरीब आणि आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणच घेता येणार नाही. खासगी विद्यापीठांचा सरकारवर दबाव आहे. तसेच सरकारला जबाबदारीतून अंग काढून घ्यायचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महाविद्यालये बंद केली जाणार आहे, असे पाटील यांनी सांगितले. खासगी विद्यापीठांबाबत विधानसभा आणि विधान परिषदेत पारित झालेल्या विधेयकावर राज्यपालांनी स्वाक्षरी केल्यावर त्याचे रुपांतर होणार आहे. त्यामुळे राज्यपालांनी विधेयक परत पाठवावे.

# कोल्हे आणि बारणे यांच्या खासदारकीवर आक्षेप

## निवडणूक निकालाविरोधात कारणे देत न्यायालयात याचिका

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून सन २०१९ मध्ये अनुक्रमे भाजपचे गिरीश बापट, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुप्रिया सुळे आणि डॉ. अमोल कोल्हे, तर शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे उमेदवार खासदार म्हणून निवडून आले. पुण्यातून ३१, तर बारामतीतून १८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शिरूर आणि मावळमधून अनुक्रमे २३ आणि २१ उमेदवार निवडणुकीला उभे होते.**



निवडणूक पार पडल्यानंतर या चारही मतदारसंघातील निवडणूक निकालाविरोधात विविध कारणे देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. या याचिका न्यायालयाने दाखल करून घेतल्या आहेत. या प्रकरणांची सुनावणी अद्याप सुरू आहे. परिणामी या निवडणुकीत वापरलेली मतदान यंत्रे मोहोरबंद करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत.या याचिकांचा निकाल लागत नाही, तोवर या निवडणुकीत वापरण्यात आलेली मतदान यंत्रे तशीच ठेवावी लागतात. त्यामुळे बॅलेट युनिट, कण्ट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट अशी मिळून एकूण तब्बल २८ हजार मतदान यंत्रे गेल्या पाऊणे पाच वर्षांपासून धूळखात पडली आहेत.

पुण्याचे खासदार बापट यांचे निधन झाल्याने पुणे लोकसभा मतदारसंघाची याचिका आपोआप निकाली काढण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात वापरण्यात आलेली मतदान यंत्रे बेंगळुरू येथे परत पाठवून देण्यात आली आहेत, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी सांगितले. परिणामी या निवडणुकीत वापरलेली मतदान यंत्रे मोहोरबंद करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत.या याचिकांचा निकाल लागत नाही, तोवर या निवडणुकीत वापरण्यात आलेली मतदान यंत्रे तशीच ठेवावी लागतात. पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून सन २०१९ मध्ये अनुक्रमे भाजपचे गिरीश बापट, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुप्रिया सुळे आणि डॉ. अमोल कोल्हे, तर शिवसेनेचे श्रीरंग बारणे हे उमेदवार खासदार म्हणून निवडून आले. पुण्यातून ३१, तर बारामतीतून १८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शिरूर आणि मावळमधून अनुक्रमे २३ आणि २१ उमेदवार निवडणुकीला उभे होते.निवडणूक पार पडल्यानंतर या चारही मतदारसंघातील निवडणूक निकालाविरोधात विविध कारणे देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या.

### या प्रकरणांची सुनावणी अद्याप सुरू

» या प्रकरणांची सुनावणी अद्याप सुरू आहे. परिणामी या निवडणुकीत वापरलेली मतदान यंत्रे मोहोरबंद करून भोसरी येथील गोदामात ठेवण्यात आली आहेत.या याचिकांचा निकाल लागत नाही, तोवर या निवडणुकीत वापरण्यात आलेली मतदान यंत्रे तशीच ठेवावी लागतात. त्यामुळे बॅलेट युनिट, कण्ट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट अशी मिळून एकूण तब्बल २८ हजार मतदान यंत्रे गेल्या पाऊणे पाच वर्षांपासून धूळखात पडली आहेत.

## पिंपरी-चिंचवड महापालिका सेवानिवृत्तांसाठी

# ‘पीसीएमसी जीवन प्रमाण ॲप’!

### विविध सांस्कृतिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी हयातीचा दाखला देण्यासाठी ऑनलाईन सिस्टिम या वर्षापासून सुरू करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार महापालिकेच्या 7153 सेवानिवृत्ती वेतनधारकांना हयातीचा दाखला देण्यासाठी यापुढे दरवर्षी महापालिकेत येण्याची गरज भासणार नाही. याकरिता महापालिकेने ‘पीसीएमसी जीवन प्रमाण’ या ॲपची निर्मिती केली असून त्यामध्ये सेवानिवृत्तांना**




**एकदाच नोंदणी करावी लागणार आहे**

सर्व सेवानिवृत्त निवृत्ती वेतन प्रदान आदेश (पीपीओ) क्रमांकानुसार महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील तळमजला (अभिलेख कक्ष) येथे त्यांचे हयातीचे प्रमाण देण्यासाठी निवृत्त वेतन प्रदान आदेश (पीपीओ ऑर्डर) आणि आधार कार्ड या कागदपत्रांसह समक्ष उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महागनरपालिकेच्या वतीने लेखा विभागात ‘पीसीएमसी जीवन प्रमाण’ ॲपचे अनावरण मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या अनावरण प्रसंगी उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी आनंद गायकवाड, लेखाधिकारी राजू जठार, सुरेंद्र देशमुखे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उपलेखापाल गीता धंगेकर, मुख्य लिपीक राजू गेंगजे, ॲपचे निर्माते आणि एल्टवाईस प्रा. लि. कंपनीचे संचालक निखील निंभोरकर तसेच लेखा विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

### ... असे चालणार कामकाज

महापालिकेचे निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अस्तित्वाची पडताळणी करणे, त्यांचे निवृत्ती वेतन त्वरित वितरण करण्याची प्रक्रिया सुलभ करणे, हयातीचा दाखला ऑनलाईन उपलब्ध करून देणे तसेच सेवानिवृत्तांच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे विविध माहिती पुरविणे इ. सुविधा ॲपद्वारे निवृत्ती वेतनधारकांना पुरविण्यात येणार आहेत. ॲपद्वारे जीवन प्रमाणपत्र डिजीटल पद्धतीने जमा करता येणार असल्याने सेवानिवृत्तांना हयातीचा दाखला देण्यासाठी यापुढे प्रत्येक वर्षी प्रत्यक्ष कार्यालयास भेट देण्याची गरज राहणार नाही, त्यामुळे वेळेची व श्रमाची बचत होणार आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांना ॲपद्वारे सुविधा देणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही राज्यातील पहिलीच महानगरपालिका असल्याची माहिती लेखा विभागाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी दिली आहे.

---

# आकुर्डीचे ग्रामदैवत खंडोबाचा आजपासून उत्सव!

### विविध सांस्कृतिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राचे कुलदैवत व आकुर्डी गावचे ग्रामदैवत श्री खंडोबा उत्सवानिमित्त (दि. १६ व १७) जानेवारीला विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे..**





श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट श्री खंडोबा उत्सव समिती व समस्त ग्रामस्थ मंडळ आकुर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने येथील खंडोबा मंदिरात दोन दिवसांचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवानिमित्त कुस्त्यांचा आखाडा भरविण्यात येणार असून सिने अभिनेत्री राधिका पाटील यांचा लावण्यचंद्रा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

उत्सवाची सुरुवात मंगळवारी पहाटे श्रींना मंगल स्नान व महाभिषेक करून होणार आहे. सायंकाळी श्रीची महाआरती होणार असून श्रींचा पालखी सोहळा संपन्न होणार आहे. श्रींच्या पालखी सोहळ्यामध्ये ग्राम प्रदक्षिणा करण्यात येणार असून ढोल पथक, गोंधळी पथक सहभागी होणार आहेत. यावेळी महाकाल उज्जैन वाद्य पथक येणार आहे. नगर प्रदक्षिणेच्या समारोपप्रसंगी फायर शो आयोजित होणार आहे. गावजात्रा मैदानावर कुस्त्यांचा भव्य आखाडा भरविण्यात येणार आहे. विजेत्या पहिलवानांसाठी दोन दुचाकी व चांदीची गदा पारितोषिक देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट उत्सव समिती आकुडर्डी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान यात्राकाळात खंडोबा मंदिरात अंदाजे दोन लाख भाविक दर्शनास येत असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होवुन वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे.

### वाहतुकीच्या नियोजनात केला बदल...



**निगडी पोलीस वाहतुक विभाग अंतर्गत पहाटे ०५.०० ते रात्री १००० वा. चे दरम्यान आवश्यकतेनुसार वाहतुक वळविण्याबाबत अधिसुचना जारी करण्यात आली आहे. वाहतुकीतील बदल पुढीलप्रमाणे...**

१) थरमॅक्स चौकाकडुन येणारी वाहतुक ही आर. डी. आगा मार्गाकडुन गरवारे कंपनी कंपाऊंड पर्यंत येवुन तेथील टी जंक्शन वरुन खंडोबामाळ चौकाकडे न जाता ती डावीकडुन परशुराम चौकाकडुन मोहननगर चिंचवड मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) परशुराम चौकाकडुन येणारी वाहतुक हि खंडोबामाळ चौकाकडे न येता ती परशुराम चौकातुन आर.डी आगा मार्गे गरवारे कंपनी कंपाऊंड टी जंक्शन वरुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.

३) चिंचवड, दळवीनगर व आकुर्डी गावठाणातुन येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकाकडुन थरमॅक्स चौकाकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत असुन सदरची वाहणे हि टिळक चौक / शिवाजी चौक बाजुकडे वळुन इच्छितस्थळी जातील.

४) टिळक चौकाकडुन येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकातुन थरमॅक्स चौक बाजुकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत असुन सदरची वाहने सरळ चिंचवड स्टेशन/ दळवीनगर मार्गे इच्छितस्थळी जातील.

# स्वराज्याचा आराखडा: कराची ठराव




**स्वातंत्र्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकले. पुढे १९३१ साली झालेल्या कराची अधिवेशनातून या वाटचालीची दिशा निश्चित झाली. कराची अधिवेशनाच्या केवळ चार दिवस आधी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना फाशी देण्यात आली होती .**

देशभर असंतोष निर्माण झाला होता. दांडी यात्रेमुळे गांधीजी तुरुंगात होते. त्यांची या अधिवेशनाच्या आधी सुटका झाली आणि गांधी-आयर्विन करार होऊन सविनय कायदेभंग चळवळ संपली होती. गांधींनी शर्थीचे प्रयत्न करूनही तीनही क्रांतिकारकांना वाचवता आले नव्हते. फाशीच्या शिक्षेने अनेक ठिकाणी दंगे सुरू झाले. काँग्रेसचे कार्यकर्ते गणेश शंकर विद्यार्थी यांनी ही दंगल शमवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शेकडोंचे जीव वाचवले. मात्र त्यांना स्वत:चा जीव गमवावा लागला. त्या पार्श्वभूमीवर गांधी म्हणाले, "गणेश शंकर विद्यार्थी यांचे रक्तच दोन धर्मांना एकत्र आणू शकेल." गांधी बोलल्यानंतर वातावरण काहीसे शांत झाले. अशा सगळ्या कल्लोळाच्या पार्श्वभूमीवर कराची अधिवेशन भरले होते. सरदार वल्लभभाई पटेल या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनाच्या सुरुवातीला भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हिंसक, क्रांतिकारी मार्गाशी फारकत घेतानाच त्यांच्या हौतात्म्याचा गौरव



केला गेला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर आपले स्वराज्य सरकार (भारतीयांचे सरकार) कसे असेल, याचा आराखडा मांडण्यासाठी ठराव केला गेला. काँग्रेसच्या मते स्वराज्य कसे असेल हे सर्वसामान्य लोकांना सांगण्याचा हा प्रयत्न होता. प्रत्येकाला आपल्या श्रद्धांनुसार वागण्याचे स्वातंत्र्य आहे' आणि 'राज्यसंस्थेने धर्माबाबत तटस्थ असले पाहिजे' ही तत्त्वे तसेच अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कापासून ते सार्वत्रिक प्रौढ मताधिकारापर्यंत अशा अनेक मूलभूत बाबी या पहिल्या भागात होत्या. श्रमविषयक असलेल्या दुसऱ्या भागात वेठबिगारी प्रथा पूर्णपणे संपुष्टात आणून कामगारांना सन्मानाने जगण्याइतपत वेतन मिळाले पाहिजे, त्यांचे कामाचे तास मर्यादित असले पाहिजेत, आरोग्यदायी वातावरणात काम करता आले पाहिजे, स्त्रियांना गरोदरपणात रजा मिळाली पाहिजे अशा तरतुदी होत्या. तिसऱ्या भागात मिठावरचा कर रद्द करण्यापासून ते शेतसारा कमी करण्यापर्यंत अनेक बाबी होत्या. अगदी शासकीय अधिकाऱ्यांचा पगार ५०० रुपयांहून अधिक असता कामा नये, अशी तरतूदही होती. लष्करावरील खर्चात कपात करण्यात यावी, असेही म्हटले होते. शेवटच्या भागात स्वदेशी कपडे, स्वदेशी उद्योग यांना परकीय स्पर्धेपासून संरक्षण मिळावे याकरता तरतुदी केल्या गेल्या. महत्त्वाचे उद्योग, खाणकाम, दळणवळण या सगळ्याचे नियंत्रण राज्यसंस्थेकडे असेल जेणेकरून राष्ट्रीय हितास प्राधान्य देता येईल. शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून मुक्त करण्यासाठीचे नियोजनही यात मांडले होते. या ठरावाचा मसुदा लिहिला होता पं. नेहरूंनी. त्याचे संपादन केले होते महात्मा गांधींनी. या ठरावाने देशाला सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रमाची नेमकी कल्पना दिली. या ठरावामुळे पहिल्यांदाच मार्गदर्शक तत्त्वांचा मुद्दा पटलावर आला. या अधिवेशनाच्या सुरुवातीला भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हिंसक, क्रांतिकारी मार्गाशी फारकत घेतानाच त्यांच्या हौतात्म्याचा गौरव केला गेला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर आपले स्वराज्य सरकार (भारतीयांचे सरकार) कसे असेल, याचा आराखडा मांडण्यासाठी ठराव केला गेला. काँग्रेसच्या मते स्वराज्य कसे असेल हे सर्वसामान्य लोकांना सांगण्याचा हा प्रयत्न होता.स्वतंत्र भारताच्या संविधानातील चौथ्या भागात या मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी करताना कराची ठराव महत्त्वाचा ठरला.'समाजवादी' हा शब्द नंतर संविधानाच्या उद्देशिकेत जोडला गेला असला तरी समाजवादी तत्त्वांची मुळे आपल्याला अशा ठरावात दिसतात.अशा सगळ्या कल्लोळाच्या पार्श्वभूमीवर कराची अधिवेशन भरले होते. सरदार वल्लभभाई पटेल या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनाच्या सुरुवातीला भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हिंसक, क्रांतिकारी मार्गाशी फारकत घेतानाच त्यांच्या हौतात्म्याचा गौरव केला गेला.

## संपादकीय »

### मन लागेना मोरा

*भारतीय अभिजात संगीताच्या मैफलीत स्त्रीच्या आगमनाला आत्ता कुठे शंभर वर्षे पूर्ण होत आहेत.*

ज्या हिराबाई बडोदेकर यांनी जाहीर मैफलीत पहिल्यांदा गायन केले, त्याच प्रभाताईंच्या गुरू. पहिले गुरू सुरेशबाबू माने आणि हिराबाई किराणा घराण्याचे संस्थापक उस्ताद अब्दुल करीम खाँ यांची अपत्ये. त्यामुळे संगीताचा हा वारसा थेट प्रभाताईंपर्यंत पोहोचला. पण गुरुमुखातून मिळालेल्या शिक्षणावर गुजराण न करता, त्यांनी त्या संगीतात स्वत:च्या प्रतिभेने कशिदाकारी केली आणि किराणा घराण्याची शैलीच समृद्ध केली. मैफली गाजवायच्या हे मुळी त्यांचे स्वप्नच नव्हते. त्यामुळे आकाशवाणीवरील नोकरी किंवा ना. दा. ठाकरसी विद्यापीठातील संगीत विभागप्रमुख पदाची जबाबदारी, यात त्या रममाण होत्या. तरीही गळ्यातले गाणे त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. 'मारुबिहाग' आणि 'कलावती' या रागांची त्यांची ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध झाली आणि त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. संगीत येणे ही वरवर फार सोपी गोष्ट वाटते. अभिजात संगीताची कास धरणे आणि निभावणे हे फार कर्मकठीण.

**लोकसभा निवडणुकीला दोन-तीन महिने आधीच राम मंदिराच्या उद्घाटनाचा घाट घालून भाजपने देशभर लाट निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते. राम मंदिराचे बांधकाम पूर्ण व्हायला दोन-तीन वर्षे लागतील. खरे तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी राम मंदिराचा राजकीय वापर भाजपला करता आला असता.**

# 'इंडिया'ने एकास एक उमेदवार दिले तर?

बांधकाम पूर्ण होण्याआधीच रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई भाजपकडून केली जात असेल तर त्याचा दुसरा अर्थ; रामाची लाट नसेल तर २०२४ची लोकसभा निवडणूक जिंकणे अधिक आव्हानात्मक ठरू शकेल. भाजपमधील चाणक्यांना हा अंदाज आला असणारच. अन्यथा फक्त तळमजला आणि पहिला मजला जेमतेम बांधला गेला असताना राम मंदिराच्या उद्घाटनाचा मुहूर्त कोण काढेल? समजा, रामाच्या मुद्द्यावरून भाजपने देशभर राष्ट्रवादाची लाट निर्माण केली तरीही 'अगली बार चारसो पार' हा महत्त्वाकांक्षी टप्पा गाठणे सहजसोपे असेलच असे नाही. भाजपने हा 'चारसो पार'चा नारा देण्यामागे दोन प्रमुख कारणे दिसतात. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची संधी २०२४च्या लोकसभा निवडणुकीतून मिळू शकेल असे पंतप्रधान नरेंद्र मोदींना वाटत असावे. पंडित नेहरूंनी सलग तीन वेळा (१९५१,१९५७ आणि १९६२) लोकसभेची निवडणूक



जिंकली होती. मोदींनी सलग दोन वेळा २०१४ व २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला आहे. आता तिसऱ्यांदा जिंकून एकाच वेळी दोन विक्रमांची बरोबरी करू शकतो असेही वाटत असावे. दुसरा विक्रम म्हणजे १९८४ मध्ये राजीव गांधींनी लोकसभेमध्ये ४१४ जागा जिंकल्या होत्या. मोदींना या वेळी चारशेहून जास्त जागा जिंकायच्या आहेत. मैलाचा दगड ठरणाऱ्या दोन महत्त्वाकांक्षा एकाच वेळी पूर्ण करायच्या असतील तर कुठल्या ना कुठल्या स्वरूपाची लाट निर्माण करावीच लागेल. ही लाट नसेल तर 'चारसो पार'चा आकडा कसा गाठणार, हा प्रश्न असेल. भाजपच्या राम मंदिराच्या राजकारणाचे हे अगदी थेट समीकरण आहे.भाजप निर्माण करू पाहात असलेल्या या लाटेमध्ये विरोधकांची 'इंडिया' महाआघाडी वाहून जाणार की, अजूनही भाजपेतर पक्षांना आगामी लोकसभा निवडणुकीत तगडया लढतीची आशा आहे? आत्ता 'इंडिया'मध्ये आलबेल नसल्याचे चित्र दिसत असल्याने हा प्रश्न कदाचित विचारला जाऊ शकतो. 'इंडिया'च्या शनिवारी झालेल्या बैठकीला तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव आणि शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित राहिले नसल्यामुळे विरोधकांच्या ऐक्याचे काही खरे नाही, असे बोलले जाऊ लागले आहे. पण वास्तव कदाचित वेगळेही असू शकेल. महाविकास आघाडीतील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यामध्ये आलेली आहे, त्यावर लवकरच शिक्कामोर्तब केले जाईल. आम आदमी पक्ष (आप) आणि काँग्रेस यांच्यामध्ये समन्वय होण्याची शक्यता नसल्याचे बोलले जात होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सरकारच्या पैशांवर शिंदेंची दावोस सहल!

## » आदित्य ठाकरेंच्या आरोपांवर मुख्यमंत्र्यांचं उत्तर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काही सहकाऱ्यांबरोबर दावोस दौऱ्यावर जाणार आहेत. मुख्यमंत्री झाल्यापासूनचा हा त्यांचा दुसरा दावोस दौरा आहे. त्यामुळे या परदेश दौऱ्यांच्या खर्चावरून शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आदित्य ठाकरे म्हणाले, घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी केलेल्या दावोसच्या दौऱ्यावर ४० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते.**



आता पुन्हा एकदा ते दावोस दौरा करणार आहेत. आधी ५० खोके आणि आता ५० लोक दावोसला चालले आहेत.दरम्यान, आदित्य ठाकरे यांच्या आरोपांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिलं आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, स्वित्झर्लंडमधील दावोस येथे १५ ते १९ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेच्या बैठकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मंगळवारी (१६) जानेवारी रोजी दाओस येथे शिष्टमंडळासमवेत उपस्थित राहणार आहेत. या परिषदेतील प्रमुख बैठकीत ते 'नागरी क्षेत्रातील आव्हाने, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शाश्वत विकास' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेत प्रथमच विक्रमी असे तीन लाख दहा हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार आहेत.मुख्यमंत्री कार्यालयाने म्हटलं आहे की, जागतिक आर्थिक परिषदेसाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत तसेच उद्योग विभाग, एमआयडीसी, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी असे दहा जणांचे शिष्टमंडळ जात आहे. एमएमआरडीए आणि 'महाप्रित' येथील ८ अधिकारी स्वतंत्ररित्या सहभागी होत असून या सर्वांना केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. या दौऱ्यामध्ये खासगी विमानाचा वापर होणार नाही.आदित्य ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्री म्हणून जेव्हा तुम्ही दावोसला किंवा कुठेही अशा परदेश दौऱ्यांवर जाता तेव्हा केंद्रीय परराष्ट्र खातं आणि अर्थ खात्याची मंजुरी घ्यावी लागते. या खात्यांकडे १० लोकांनी परवानगी मागितली होती आणि तशी परवानगी देण्यात आली आहे. परंतु, आता ५० लोक जात आहेत, असं समजतंय. त्यांनी ही संमती घेतली आहे का? कारण फक्त १० लोकांची संमती घेतली आहे. माझी भीती असल्याने चार्टर्ड प्लेनने (खासगी विमानाने) ते जात नाहीयेत. त्याचबरोबर २० कोटींपेक्षा जास्त खर्च दाखवायचा नाही असं ठरलं आहे. एक खासदार जात आहे, एक माजी खासदार जात आहेत. आता गद्दारी केली तर दावोसला नेत आहेत.माजी पर्यटन मंत्री म्हणाले, दावोस दौऱ्यावर ५ ते ६ जण जातात. MOU (करार) सही करायला इतके लोक पुरेसे असतात. अशात ५० जणांना घेऊन का जात आहेत? त्यात दोन ते तीन दलालही आहेत. दावोस हे कलानगर इतकं छोटं गाव आहे. या परिषदेतील प्रमुख बैठकीत ते 'नागरी क्षेत्रातील आव्हाने, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शाश्वत विकास' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेत प्रथमच विक्रमी असे तीन लाख दहा हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. ही सगळी यादी आपण पाहिली तर तुम्हालाही प्रश्न पडेल की, हे सगळे जण तिकडे मजा करायला चालले आहेत की काम करायला? ५० लोक का घेऊन जात आहेत? यांना सरकारने संमती दिली आहे.

### 50 खोके आणि आता 50 लोक

» या परिषदेतील प्रमुख बैठकीत ते 'नागरी क्षेत्रातील आव्हाने, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शाश्वत विकास' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काही सहकाऱ्यांबरोबर दावोस दौऱ्यावर जाणार आहेत. मुख्यमंत्री झाल्यापासूनचा हा त्यांचा दुसरा दावोस दौरा आहे. त्यामुळे या परदेश दौऱ्यांच्या खर्चावरून शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आदित्य ठाकरे म्हणाले, घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी केलेल्या दावोसच्या दौऱ्यावर ४० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. आता पुन्हा एकदा ते दावोस दौरा करणार आहेत. आधी ५० खोके आणि आता ५० लोक दावोसला चालले आहेत.या परिषदेत प्रथमच विक्रमी असे तीन लाख दहा हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार आहेत.मुख्यमंत्री कार्यालयाने म्हटलं आहे की, जागतिक आर्थिक परिषदेसाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत तसेच उद्योग विभाग, एमआयडीसी, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी असे दहा जणांचे शिष्टमंडळ जात आहे.

# ॲड. प्रकाश आंबेडकरांना मंत्रिपदाची ऑफर

## » वंचितचा इंडिया आघाडीत समावेश होण्याचा मुद्दा रेंगाळला

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वंचितचा इंडिया आघाडीत समावेश होण्याचा मुद्दा रेंगाळला आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यासाठी 'एनडीए'ची दारे सदैव उघडी आहेत. ते 'एनडीए'मध्ये सहभागी झाल्यास आनंदच असून त्यांना माझे मंत्रिपद देण्यास तयार आहे, अशी थेट ऑफरच केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली. 'एनडीए'मध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण त्यांनी ॲड.आंबेडकर यांना दिले.**

अकोल्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, "राज्यात गटातटात विभागलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुढाकार घेतला पाहिजे. ऐक्याचा चेंडू प्रकाश आंबेडकर यांच्या कोर्टात आहे. आरपीआय एकत्रित यावा, ही माझी पूर्वीच भूमिका राहिली. मात्र, तीन आंबेडकर बंधूच वेगवेगळे राजकारण करीत आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पक्षाचे नाव सुद्धा बदलले. सर्वप्रथम त्यांनी एकत्रित येण्याची गरज आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वात काम करण्याची तयारी असून ते एनडीएमध्ये सहभागी



झाल्यास त्यांना माझे मंत्रिपद देखील देईल.ग्रामीण भागातील भूमिहीन नागरिकांना पाच एकर जमीन मिळावी, यासाठी राज्य शासनाने समिती नेमण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. भूदान चळवळीप्रमाणे पुन्हा एकदा मोहीम राबवली जाऊ शकते का? या दृष्टीने देखील प्रयत्न राहतील. विदर्भाला न्याय मिळावा, ही रिपब्लिकन पक्षाची भूमिका राहिली आहे. आगामी काळात विदर्भात पक्ष मजबूत करण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न केले जातील, असे रामदास आठवले म्हणाले. राज्यात महायुती ४८ पैकी ४५ जागा जिंकेल. आरपीआयला किमान दोन लोकसभेच्या जागा मिळण्यासाठी भाजपच्या वरिष्ठांची भेट घेणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जागतिक स्तरावरील लोकप्रिय नेते असून निवडणुकीमध्ये एनडीए आघाडीला ४०० पेक्षा अधिक जागा मिळेल, असा दावा देखील रामदास आठवलेंनी केला. संविधानाला अनुरूप कार्य मोदी सरकारने केले असून काँग्रेसने फक्त दलितांचे मते घेण्याचे काम केले.

### आरक्षणाचा प्रश्न सुटेल

» तामिळनाडूमध्ये ६९ टक्के आरक्षण असून तो पॅटर्न महाराष्ट्रात लागू झाल्यास मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू शकेल. जातीनिहाय जनगणनेला तांत्रिक अडचण असली तरी ती झाल्यास प्रत्येक जातीची टक्केवारी कळेल. त्यानुसार आरक्षणात वाटा देता येईल, असे देखील रामदास आठवले म्हणाले.शिंदे सरकार स्थापन झाल्यावर आरपीआयला एक मंत्रिपद मिळायला पाहिजे होते. विस्तार ते देण्यात येईल, असे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले होते.

# आप आणि काँग्रेसचा दिल्ली फॉर्म्युला!

## आप आणि काँग्रेसचा चार राज्यात जागावाटप ठरला!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशाच्या राजकारणामध्ये अभूतपूर्वक ठरलेल्या आप आणि काँग्रेसच्या संघर्षाचा इतिहास नवीन नाही. या दोन पक्षांमुळेच भाजपला देशव्यापी आपले पाय पसरता आले. आता याच देशव्यापी पसरलेल्या भाजपच्या आव्हानासमोर 2024 लोकसभा निवडणुकीसाठी तगडे आव्हान निर्माण करण्यासाठी आप आणि काँग्रेस पक्ष (AAP-CONGRESS SEAT SHARING FORMULA) एकत्र आले आहेत. आपचे प्राबल्य असलेल्या चार राज्यामध्ये आप आणि काँग्रेसची चार राज्यांमधील जागावाटपावर जवळपास अंतिम चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.**

दिल्ली, गुजरात, पंजाब आणि हरियाणा या चार राज्यांमध्ये काँग्रेस आणि आपमध्ये जागा वाटपावरून जवळपास अंतिम रूप देण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस आणि आपमध्ये सातत्याने बैठकांचं सत्र सुरु असून या बैठका फलद्रुप होत असल्याचे चित्र आहे. या बैठकांनंतर दोन्ही पक्षांमधील ज्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत त्यामध्ये सुद्धा या दोन्ही पक्षांमध्ये विरोधाभास दिसून आलेला नाही. त्यामुळे चर्चा योग्य टप्प्यात असल्याचे मानले जात आहे. जागावाटपाचा फॉर्म्युला सुद्धा ठरल्याची माहिती आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही पक्षांनी चार राज्यांमध्ये किती जागा लढवणार? यावर जवळपास ठरवलं आहे. आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल आणि काँग्रेस अध्यक्ष मलिकार्जुन खरगे यांच्यामध्ये झालेल्या बैठकीनंतर अनेक निर्णयांवर एकमत झालं आहे. या फॉर्म्युल्यावर अंतिम बोलणी सुरू आहेत. त्यामुळे उर्वरित चर्चा पूर्ण झाल्यानंतर औपचारिक घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांमध्ये जो जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवला जात आहे, तो असा काहीसा असेल, असे सांगितले जात आहे.



दिल्लीत आप 4 तर काँग्रेस 3 जागांवर निवडणूक लढवू शकते. पंजाबबाबत दोघेही स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. मात्र, निवडणुकीपूर्वी अकाली दल आणि भाजप पुन्हा एकत्र आल्यास त्यानंतर दोन्ही पक्ष पंजाबमध्ये निवडणूक लढवतील, असेही त्यांच्यात ठरले आहे. गुजरातमध्ये काँग्रेस 'आप'ला फक्त 2 जागा देऊ शकते. 'आप'ने 2 हून अधिक जागा मागितल्या आहेत. हरयाणातही 'आप'ने 2 ते 3 जागांवर निवडणूक लढवण्याची मागणी केली आहे. मात्र, इथेही काँग्रेस आम आदमी पार्टीला 1 पेक्षा जास्त जागा देण्यास तयार नाही. गोव्यात काँग्रेस सध्या 'आप'ला एकही जागा देण्यास तयार नाही. त्याचे कारण म्हणजे गोव्यात लोकसभेच्या फक्त 2 जागा आहेत आणि काँग्रेसला दोन्हीवर निवडणूक लढवायची आहे.

13 जानेवारीला आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांची भेट घेतली. दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते अशा प्रकारे एकमेकांना भेटण्याची ही पहिलीच वेळ होती. अशा परिस्थितीत या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली आणि विशेषत: जागावाटपाच्या फॉर्म्युल्याबाबत दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये आतापर्यंत सुरू असलेल्या बैठका कशा पुढे न्याव्यात यावरही चर्चा झाली. दुसरीकडे, दोन्ही पक्षातील नेते यावर उघडपणे काहीही बोलण्याचे टाळत आहेत. आप नेते सौरभ भारद्वाज यांना खरगे आणि राहुल गांधी यांच्या अरविंद केजरीवाल यांच्या भेटीनंतर जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे का? असे विचारले असता ते म्हणाले की, केजरीवाल यांची राहुल गांधी आणि खरगे यांच्या भेटीनंतर चर्चा झाली असावी. आघाडीच्या नेत्यांची ही बैठक असल्याचे त्यांनी सांगितले. अजून फार काही बाहेर आलेले नाही. युतीबाबत अजूनही चर्चा सुरू आहे. दोन्ही पक्ष युतीबाबत अत्यंत सकारात्मक असून लवकरच निष्कर्षापर्यंत पोहोचतील, असे सौरभ यांनी सांगितले. यावरून दोन्ही पक्षांच्या नेत्यांमधील बैठकांचा फेरा यापुढेही सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. देशाच्या राजकारणामध्ये अभूतपूर्वक ठरलेल्या आप आणि काँग्रेसच्या संघर्षाचा इतिहास नवीन नाही. या दोन पक्षांमुळेच भाजपला देशव्यापी आपले पाय पसरता आले. आता याच देशव्यापी पसरलेल्या भाजपच्या आव्हानासमोर 2024 लोकसभा निवडणुकीसाठी तगडे आव्हान निर्माण करण्यासाठी आप आणि काँग्रेस पक्ष (AAP-CONGRESS SEAT SHARING FORMULA) एकत्र आले आहेत.

### शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता

» आपचे प्राबल्य असलेल्या चार राज्यामध्ये आप आणि काँग्रेसची चार राज्यांमधील जागावाटपावर जवळपास अंतिम चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत आप 4 तर काँग्रेस 3 जागांवर निवडणूक लढवू शकते. पंजाबबाबत दोघेही स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. मात्र, निवडणुकीपूर्वी अकाली दल आणि भाजप पुन्हा एकत्र आल्यास त्यानंतर दोन्ही पक्ष पंजाबमध्ये निवडणूक लढवतील, असेही त्यांच्यात ठरले आहे. गुजरातमध्ये काँग्रेस 'आप'ला फक्त 2 जागा देऊ शकते.

# कानाकोपऱ्यातून अयोध्येला विमानसेवा

## रामभक्तांना अयोध्येला पाठवण्याची सर्व तयारी सुरू

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अयोध्येतील राम मंदिराच्या (RAM MANDIR) उद्घाटनासाठी फक्त एक आठवडा उरला आहे. याआधी देशाच्या कानाकोपऱ्यातून रामभक्तांना अयोध्येला पाठवण्याची सर्व तयारी सुरू आहे. रेल्वे देशाच्या प्रत्येक भागातून आस्था स्पेशल ट्रेन चालवत आहे. विमान कंपन्याही अयोध्येला उड्डाणाची घोषणा करत आहेत. या संबंधाशी संबंधित नवीनतम नाव स्पाइसजेट आहे.**

कंपनीने अयोध्येहून चेन्नई, बंगळुरु आणि मुंबईसाठी थेट विमानसेवा सुरु करण्याची घोषणा केली आहे. 1 फेब्रुवारीपासून ही विमानसेवा सुरू होणार आहे.



22 जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा होणार आहे. यानंतर देशभरातील लोकांना अयोध्येला जायला आवडेल. देशाच्या विविध भागातून लोकांना अयोध्येला जाण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी रेल्वे आणि विमान वाहतूक कंपन्यांनी मोठी तयारी केली आहे. रेल्वे देशाच्या विविध भागातून आस्था स्पेशल ट्रेन चालवत आहे. एअर इंडिया एक्सप्रेस अयोध्या फ्लाइट आणि इंडिगो अयोध्या फ्लाइटने तेथून थेट उड्डाणे सुरू करण्याचे आधीच जाहीर केले आहे. आता स्पाईसजेट अयोध्या फ्लाइटने अयोध्येहून मुंबई, चेन्नई आणि बेंगळुरूसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही सेवा 1 फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. स्पाइसजेटने जारी केलेल्या निवेदनानुसार 1 फेब्रुवारी 2024 पासून या मार्गांवर थेट उड्डाणे उपलब्ध होतील. या मार्गांवर 189 आसनी बोइंग 737 विमाने बसवण्यात येणार आहेत. यासोबतच, कंपनीने संकेत दिले आहेत की ते लवकरच अयोध्येपासून देशातील इतर काही शहरांसाठी थेट विमानसेवा सुरू करू शकते.मागच्या आठवड्यातच स्पाइसजेटने परतीच्या विमानासह दिल्ली ते अयोध्या थेट विमानसेवा जाहीर केली होती. दिल्ली ते अयोध्या हे विमान दीड तासात जाणार आहे. दिल्लीहून हे विशेष विमान (दिल्ली ते अयोध्या डायरेक्ट फ्लाइट टाइम टेबल) 21 जानेवारी रोजी दुपारी 1.30 वाजता सुटेल आणि दुपारी 3 वाजता अयोध्येला पोहोचेल. विशेष विमान अयोध्येहून 22 जानेवारी रोजी संध्याकाळी 5 वाजता निघेल (अयोध्या-दिल्ली थेट फ्लाइट टाइम टेबल) आणि संध्याकाळी 06.30 वाजता दिल्लीत उतरेल.


# नार्वेकरांच्या विरोधात न्यायालयात धाव

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी महत्त्वाच्या निकालाचं वाचन केलं. त्यानुसार, ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले असून खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. याविरोधात कायदेविषयक लढाई लढण्याकरता त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात या निकालाविरोधात याचिका दाखल केली असल्याचे वृत्त कायदेशीर वृत्तस्थळ असलेल्या लाईव्ह लॉने दिले आहे. दरम्यान, ठाकरे गटाने ऑनलाईन याचिका दाखल केली आहे. मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं. तसंच, मर्यादित कालावधीत याबाबतचा निकाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, या सुनावणीला जून महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्षात सुरुवात झाली. परंतु, ही सुनवाणी अखंडित होऊ शकली नाही. सुनावणीला वेग यावा आणि लवकर निकाल लागावा म्हणून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्यानुसार, सुनावणी सुरू झाली. दोन्ही गटांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर याप्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागण्याची शक्यता होती. परंतु, राहुल नार्वेकर यांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला.

# अमिताभ बच्चन यांनीसुद्धा घेतली अयोध्येत जमीन!



बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन सध्या चर्चेत आहेत. पण यंदा बिग बी कोणत्याही कलाकृतीमुळे चर्चेत नसून एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहेत. 22 जानेवारीला अयोध्येत होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं त्यांना खास आमंत्रण देण्यात आलं आहे. अशातच आता ते अयोध्यावासी होणार असल्याचं समोर आलं आहे. बॉलिवूडचे सुपरस्टार अभिनेते अमिताभ बच्चन यांनी अयोध्येत घरासाठी प्लॉट खरेदी केला आहे. 10,000 स्क्वेअर फुटाच्या या फ्लॉटची किंमत 14.5 कोटी रुपयांच्या आसपास आहे. बिग बींनी 'द हाऊस ऑफ अभिनंद लोढा' या बॅनरअंतर्गत अयोध्येत प्लॉट विकत घेतला आहे.


# '12वी फेल'चं हृतिकनं तोंडभरुन केलं कौतुक

अभिनेता हृतिक रोशन सध्या त्याच्या आगामी 'फायटर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरचे सर्वजण कौतुक करत आहेत. एकीकडे हृतिकच्या चित्रपटाच्या ट्रेलरचे कौतुक होत असताना दुसरीकडे हृतिकने विक्रांत मॅसीच्या 12 वी फेल या चित्रपटाचे कौतुक केले आहे. हृतिकनं ट्विटरवर ट्वीट शेअर करुन 12 वी फेल या चित्रपटाचे कौतुक केले आहे.हृतिक रोशनने ट्वीटमध्ये लिहिलं, "मी 12 वी फेल हा चित्रपट पाहिला. फिल्म मेकिंगमधला हा एक मास्टरक्लास आहे. इतर सर्व गोष्टींपेक्षा मला साऊंड आणि चित्रपटातील सीन अधिक रंजक करण्यासाठी वापरण्यात आलेले साऊंड इफेक्ट्स खूप आवडले. ब्रिलियन्ट परफॉर्मन्स. मिस्टर चोप्रा, काय चित्रपट आहे! मला यातून खूप प्रेरणा मिळाली आहे."हृतिकने या चित्रपटाचे कौतुक केले आहे पण नेटकऱ्यांनी एका कारणामुळे त्याला सुनावले आहे. हृतिक त्याच्या ट्वीटमध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा यांचा उल्लेख केला आहे परंतु त्याने चित्रपटाच्या मुख्य अभिनेत्याचा म्हणजे विक्रांत मॅसीचा कुठेही उल्लेख केलेला नाही. हृतिकच्या या चुकीमुळे नेटकऱ्यांनी त्याला ट्रोल केलं.

एका यूजरने हृतिकच्या ट्वीटला कमेंट केली आहे की, :तुम्हाला फक्त विधू विनोद चोप्रा दिसले का? चित्रपटाची बाकीची स्टारकास्ट दिसली नाही"? दुसऱ्या युजरने लिहिले - त्याचप्रमाणे अनेक नेटकरी ट्वीटमध्ये विक्रांतला क्रेडिट न दिल्याबद्दल हृतिक रोशनला टोमणे मारत आहेत.

# श्रुतीच्या फोटोमध्ये धर्मेंद्र?

ज्येष्ठ चित्रपट अभिनेते धर्मेंद्र (DHARMENDRA) 8 8 वर्षांचे झाले आहेत. पण वयाच्या या टप्प्यावरही ते अभिनय क्षेत्रात काम करत आहेत. गेल्या वर्षी रिलीज झालेल्या रॉकी और रानी की प्रेम कहानी या चित्रपटामधील धर्मेंद्र यांच्या अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. धर्मेंद्र यांनी आमिर खानची मुलगी आयरा खान आणि नुपूर शिखरे यांच्या लग्नाच्या रिसेप्शनला देखील हजेरी लावली होती. धर्मेंद्र यांनी रिसेप्शन सोहळ्याला धमाकेदार एन्ट्री करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले.धर्मेंद्र यांनी आयरा आणि नुपूर यांच्या रिसेप्शन सोहळ्याला धमाकेदार एन्ट्री केली. यावेळी धर्मेंद्र एकटे दिसले. धर्मेंद्र हे कार्यक्रमाला पोहोचताच सर्वांच्या नजरा त्याच्यावर खिळल्या. पण यादरम्यान त्याने तमिळ सुपरस्टार कमल हासन यांच्या मुली श्रुती आणि अक्षरा यांच्या फोटो सेशनमध्ये धर्मेंद्र यांची एन्ट्री झाली. त्यामुळे गोंधळ झाला. धर्मेंद्र हे फोटो सेशनमध्ये आले त्यामुळे श्रुती आणि अक्षरा या बाजूला झाल्या. त्यानंतर त्यांच्या हास्यानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या घटनेनंतर लोक वेगवेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देत आहेत.



# 'लोकशाही'चं पोस्टर आऊट!

या मराठी सिनेमाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या धमाकेदार कलाकृतीची आतुरतेने वाट पाहत आहेत. तगडी स्टारकास्ट असलेला हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. घराणेशाहीतला सत्तासंघर्ष टिपणाऱ्या 'लोकशाही'च्या नव्या पोस्टरने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.माणसाची पैशांप्रती भूक भागली की त्याच्या लोभेची धाव सत्तेकडे गतिमान होते आणि अशा सत्तासंघर्षाचा वारसा आपल्या भारत भूमीला थेट प्राचीन महाभारतापासून लाभलेला आहे. घराणेशाहीतला हा सत्तासंघर्ष नेमका मिळालेला लाभ की शास्वत शाप हा प्रश्न उपस्थित करणारा सुशीलकुमार अग्रवाल निर्मित 'लोकशाही' या सिनेमाच्या पोस्टरवरून प्रकर्षाने जाणवत आहे. 'लोकशाही'च्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या दृकश्राव्य गतिशिल शीर्षक पोस्टरमधून प्रेक्षकांच्या मनामनात उत्सुकता निर्माण जागी झाली होती. 15 जानेवारी 2024 रोजी मकर संक्रांतीचे औचित्य साधून प्रदर्शित झालेल्या चित्रपटाच्या मुख्य पोस्टरने आता प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेबरोबरच विलक्षण प्रश्नांची ठिणगी पेटवली आहे. 'लोकशाही'च्या पोस्टरमध्ये सुप्रसिद्ध अभिनेते मोहन आगाशे विचारमग्न गंभीर अशा अवस्थेत असून समीर धर्माधिकारी, तेजश्री प्रधान, भार्गवी चिरमुले आणि मराठी सिनेसृष्टीत नावाजलेला अमराठी अभिनेता अंकित मोहन हात जोडून लाखोंच्या संख्येत असणाऱ्या जनतेसमोर काहीतरी आव्हान करत असल्याचे दिसत आहे. नेमके हे आव्हान काय असणार आहे आणि या आव्हानाला जनतेचा काय कौल असणार आहे, हे गुपित प्रेक्षकांच्या उत्सुकतेला ठळक साद घालत आहे.प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहचवणारा 'लोकशाही' सिनेमा संजय अमर यांनी दिग्दर्शित केला असून 9 फेब्रुवारी 2024 रोजी महाराष्ट्रात सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# अंकिताच्या सासूवर भडकली राखी सावंत

'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाची प्रेक्षकांमध्ये चांगलीच क्रेझ आहे. नुकताच या कार्यक्रमाचा 'फॅमिली वीक' पार पडला. या 'फॅमिली वीक'नंतर अंकिता लोखंडेच्या (ANKITA LOKHANDE) आईवर राखी सावंत (RAKHI SAWANT) भडकलेली दिसून आली. 'बिग बॉस 17' या कार्यक्रमाच्या नुकत्याच पार पडलेल्या भागात अंकिता लोखंडे आणि विकी जैनची आई आलेली पाहायला मिळाली. विकीच्या आईने अंकिताकडे आपली नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या,"तू विकीला लाथ मारल्यानंतर त्याच्या वडिलांनी लगेचच तुझ्या आईला फोन केला होता". विकीच्या आईच्या बोलण्याने अंकिताला खूप वाईट वाटलं होतं. आता बॉलिवूडची 'ड्रामाक्वीन' राखी सावंतने अंकिताला पाठिंबा देत विकीच्या आईला शांत राहण्याचा सल्ला दिला आहे. राखी सावंत आणि 'बिग बॉस'चं एक वेगळच कनेक्शन आहे. 'बिग बॉस 17' राखी सावंत फॉलो करत आहे. राखीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. व्हिडीओमध्ये राखी सावंत अंकिता लोखंडेला पाठिंबा देताना आणि विकीच्या आईला शांत राहण्याचा सल्ला देताना दिसत आहे. राखी सावंत म्हणाली,"नमस्कार मित्रांनो, मला अंकिताच्या सासूबाईंना सांगायचं आहे की,सासूदेखील कधी सून होती. पती-पत्नीमध्ये तुम्ही कशाला कबाब में हड्डी होत आहात? तुमच्या मुलाने अंकितासोबत आता संसार थाटला आहे. तुम्ही शांत राहा. मजा करा". राखी सावंत पुढे म्हणाली,"बिग बॉस 17'ची ट्रॉफी अंकिता लोखंडे जिंकणार आहे. मी आता ही भविष्यवाणी केली आहे. आमची मराठी मुलगी 'बिग बॉस' जिंकणार. त्यावेळी सून जिंकल्यानंतर तुम्हाला वेगळा आनंद होईल. सूनेचा आदर करा. तर तुमच्या मुलीचाही तिच्या सासरी आदर केला जाईल". 'बिग बॉस 17' हा कार्यक्रम आता अंतिम टप्प्यात आला आहे. या कार्यक्रमाचा कोण विजेता होणार याकडे 'बिग बॉस'प्रेमींचं लक्ष लागलं आहे.'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाची प्रेक्षकांमध्ये चांगलीच क्रेझ आहे. नुकताच या कार्यक्रमाचा 'फॅमिली वीक' पार पडला. या 'फॅमिली वीक'नंतर अंकिता लोखंडेच्या (ANKITA LOKHANDE) आईवर राखी सावंत (RAKHI SAWANT) भडकलेली दिसून आली. 'बिग बॉस 17' या कार्यक्रमाच्या नुकत्याच पार पडलेल्या भागात अंकिता लोखंडे आणि विकी जैनची आई आलेली पाहायला मिळाली.



# इंग्लंडचा बेन डकेत घाबरला!

## अश्विनचे जागतिक दर्जाचे गोलंदाज म्हणून केले वर्णन

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वीच इंग्लंडचा संघ घाबरलेला दिसत आहे. इंग्लंडचा सलामीचा फलंदाज बेन डकेटने मालिका सुरू होण्यापूर्वी भारतीय फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनचे कौतुक केले. त्याने अश्विनचे जागतिक दर्जाचे गोलंदाज म्हणून वर्णन केले आणि आगामी मालिकेत त्याला बाद केल्यास आश्चर्य वाटणार नाही असे सांगितले. भारतीय चाहत्यांनी याला माइंड गेम खेळत असल्याचे म्हटले आहे.**

आर. अश्विन हा आशियाई खेळपट्ट्यांवर भारताचा प्रमुख गोलंदाज आहे. अश्विनने इंग्लंडविरुद्धच्या १९ कसोटींमध्ये ८८ विकेट्स घेतल्या आहेत, त्यापैकी ७४ भारतीय भूमीवर आल्या आहेत. डकेटने भारतात दोन सामने खेळले असून तिन्ही डावात त्याने फलंदाजी केली आहे. प्रत्येक वेळी अश्विनने त्याला बाद केले असून अशी कामगिरी करणारा तो पहिला गोलंदाज ठरला होता. मात्र, त्या मालिकेनंतर बेन डकेटने त्याच्या फलंदाजी तंत्रात खूप चांगला बदल केला आणि आता तो इंग्लंड संघातील प्रमुख फलंदाज बनला आहे.बेन डकेट म्हणाला की, तो आगामी आव्हानांसाठी तयार आहे आणि यावेळी त्याने अश्विनचे भरभरून कौतुक केले. डकेट म्हणाला की, “अश्विनविरुद्ध संघर्ष करणारा तो पहिला डावखुरा फलंदाज नाही.” तो पुढे म्हणाला, “मी त्या मालिकेनंतर खूप क्रिकेट खेळलो आहे आणि त्या वर्षांतील अनुभव मला परिपक्व बनवून गेला आणि ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. यावेळी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारत माझ्याबाबत ज्या काही योजना करेल त्या माझ्यासाठी नवीन नसतील. मी भारतीय संघ कोणत्या योजना आखतो हे पाहण्यासाठी उत्सुक आहे. अशा प्रकारच्या फिरकी खेळपट्ट्यांवर खेळण्याची मला सवय झाली आहे. भारतात चांगली कामगिरी करण्याचे माझे ध्येय आहे. तिथून बाहेर गेल्यावर काय अपेक्षा ठेवायची हे मला चांगलंच माहीत आहे. अशा परिस्थितीत अश्विनविरुद्ध संघर्ष करणारा मी शेवटचा डावखुरा खेळाडू नव्हतो. त्याने इतर देशातील संघांना देखील अडचणीत आणले आहे.यावेळीही अश्विन डकेटला बाद करेल याची त्याला खात्री असल्याचे इंग्लंडच्या सलामीवीराने सांगितले, परंतु भारतीय परिस्थितीत तो स्वतःच्या







फलंदाजीवर विश्वास ठेवेल. फिरकी खेळपट्ट्या टीम इंडिया देईल यात आश्चर्य वाटणार नाही, असा दावा त्याने केला. तो म्हणाला, “मला खात्री आहे की अश्विन पुन्हा ड्रेसिंग रूममध्ये पाठवेल, तो जागतिक दर्जाचा गोलंदाज आहे. पण मी आता चांगल्या खेळपट्टीवर किंवा सपाट खेळपट्टीवर जसे खेळतो तसेच इथे देखील खेळेन जेणेकरून मला आक्रमक शॉट्स खेळावे लागतील असे वाटणार नाही. प्रत्येक चेंडूवर स्वीप करणार नाही.त्या खेळपट्ट्या अधिक फिरकी घेणाऱ्या असतील आणि गेल्या १८ महिन्यांत हा संघ ज्या प्रकारे खेळला आहे, तसेच आम्ही खेळू. मला माहित आहे की माझी ताकद काय आहे आणि मी नक्कीच उत्तम प्रदर्शन करेन. भारतीय चाहते माझ्या खेळीने आश्चर्यचकित होणार अशी कामगिरी करेन,” डकेट म्हणाला. यातून इंग्लंडचा संघ कसोटी मालिकेयाधी माइंड गेम खेळत आहे, हे दिसून येते. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन्स फायनलच्या दृष्टीने ही मालिका खूप महत्वाची आहे.आर. अश्विन हा आशियाई खेळपट्ट्यांवर भारताचा प्रमुख गोलंदाज आहे. अश्विनने इंग्लंडविरुद्धच्या १९ कसोटींमध्ये ८८ विकेट्स घेतल्या आहेत, त्यापैकी ७४ भारतीय भूमीवर आल्या आहेत. डकेटने भारतात दोन सामने खेळले असून तिन्ही डावात त्याने फलंदाजी केली आहे. प्रत्येक वेळी अश्विनने त्याला बाद केले असून अशी कामगिरी करणारा तो पहिला गोलंदाज ठरला होता. मात्र, त्या मालिकेनंतर बेन डकेटने त्याच्या फलंदाजी तंत्रात खूप चांगला बदल केला आणि आता तो इंग्लंड संघातील प्रमुख फलंदाज बनला आहे.बेन डकेट म्हणाला की, तो आगामी आव्हानांसाठी तयार आहे आणि यावेळी त्याने अश्विनचे भरभरून कौतुक केले. डकेट म्हणाला की, “अश्विनविरुद्ध संघर्ष करणारा तो पहिला डावखुरा फलंदाज नाही.” तो पुढे म्हणाला, “मी त्या मालिकेनंतर खूप क्रिकेट खेळलो आहे आणि त्या वर्षांतील अनुभव मला परिपक्व बनवून गेला आणि ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. यावेळी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारत माझ्याबाबत ज्या काही योजना करेल त्या माझ्यासाठी नवीन नसतील. मी भारतीय संघ कोणत्या योजना आखतो हे पाहण्यासाठी उत्सुक आहे. अशा प्रकारच्या फिरकी खेळपट्ट्यांवर खेळण्याची मला सवय झाली आहे. भारतात चांगली कामगिरी करण्याचे माझे ध्येय आहे. तिथून बाहेर गेल्यावर काय अपेक्षा ठेवायची हे मला चांगलंच माहीत आहे. अशा परिस्थितीत अश्विनविरुद्ध संघर्ष करणारा मी शेवटचा डावखुरा खेळाडू नव्हतो.

### भानवालानेही कोटा मिळवला

भारतीय चाहते माझ्या खेळीने आश्चर्यचकित होणार अशी कामगिरी करेन,” डकेट म्हणाला. यातून इंग्लंडचा संघ कसोटी मालिकेयाधी माइंड गेम खेळत आहे, हे दिसून येते. .आर. अश्विन हा आशियाई खेळपट्ट्यांवर भारताचा प्रमुख गोलंदाज आहे. अश्विनने इंग्लंडविरुद्धच्या १९ कसोटींमध्ये ८८ विकेट्स घेतल्या आहेत, त्यापैकी ७४ भारतीय भूमीवर आल्या आहेत. डकेटने भारतात दोन सामने खेळले असून तिन्ही डावात त्याने फलंदाजी केली आहे. प्रत्येक वेळी अश्विनने त्याला बाद केले असून अशी कामगिरी करणारा तो पहिला गोलंदाज ठरला होता. मात्र, त्या मालिकेनंतर बेन डकेटने त्याच्या फलंदाजी तंत्रात खूप चांगला बदल केला आणि आता तो इंग्लंड संघातील प्रमुख फलंदाज बनला आहे.बेन डकेट म्हणाला की, तो आगामी आव्हानांसाठी तयार आहे आणि यावेळी त्याने अश्विनचे भरभरून कौतुक केले. डकेट म्हणाला की, “अश्विनविरुद्ध संघर्ष करणारा तो पहिला डावखुरा फलंदाज नाही.” तो पुढे म्हणाला, “मी त्या मालिकेनंतर खूप क्रिकेट खेळलो आहे आणि त्या वर्षांतील अनुभव मला परिपक्व बनवून गेला आणि ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. यावेळी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारत माझ्याबाबत ज्या काही योजना करेल त्या माझ्यासाठी नवीन नसतील. मी भारतीय संघ कोणत्या योजना आखतो हे पाहण्यासाठी उत्सुक आहे.

# कर्नाटकच्या १८ वर्षीय खेळाडूची लारासारखी खेळी

## मुंबईविरोधात नाबाद 404 धावा; द्रविडच्या मुलाचीही अष्टपैलू कामगिरी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून खेळवल्या जाणाऱ्या १९ वर्षांखालील देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत कर्नाटकच्या एका खेळाडूने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. कूच बिहार चषकाच्या अंतिम सामन्यात कर्नाटकचा सलामीवर प्रखर चतुर्वेदी याने मुंबईविरोधात नाबाद ४०४ धावांची खेळी साकारली आहे.**

आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लारा याने २० वर्षांपूर्वी इंग्लंडविरोधात नाबाद ४०० धावांची खेळी साकारली होती. लाराचा तो विक्रम आजही अबाधित आहे. प्रखरच्या या खेळीने सर्वांना लाराच्या इंग्लंडविरोधातल्या खेळीची आठवण करून दिली.मुंबई आणि कर्नाटकचे संघ कूच बिहार चषकाच्या अंतिम फेरीत धडकले होते. उभय संघांमधील सामन्यात मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ३८० धावा फटकावल्या होत्या. त्याविरोधात खेळणाऱ्या कर्नाटकच्या संघाने प्रखर चतुर्वेदीच्या नाबाद ४०४ धावांच्या खेळीच्या जोरावर ८ गड्यांच्या बदल्यात ८९० धावांचा पर्वत उभा केला. या चार दिवसीय






क्रिकेट सामन्यात दोनच डाव खेळवता आले. दरम्यान, हा सामना अनिर्णित राहिला. प्रखरने ६३८ चेंडूत तब्बल ४६ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४०४ धावांची बलाढ्य खेळी साकारली. यासह प्रखर हा कूच बिहार चषकात एका डावात ४०० धावा फटकावणारा पहिलाच खेळाडू ठरला आहे. दरम्यान, या सामन्यात प्रखरने ९ व्या विकेटसाठी समर्थ एन. च्या साथीने नाबाद १७३ धावांची भागीदारी केली. समर्थने १३५ चेंडूत नाबाद ५५ धावा केल्या. प्रखरव्यतिरिक्त हर्शिल थरमानी याने या सामन्यात १६९ धावांची शतकी खेळी साकारली. तसेच कार्तिकेय के. पी. (७२), हार्दिक राज (५१) आणि कार्तिक एसयू (५०) या तिघांनी अर्धशतकं ठोकली.भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड याचा मुलगा समित द्रविड यानेदेखील या सामन्यात कर्नाटकचं प्रतिनिधित्व केलं होतं. समितने केवळ २२ धावा करून बाद झाला. मात्र गोलंदाजीत त्याने १९ षटकांत दोन बळी घेतले.कूच बिहार चषक स्पर्धा ही नवोदित खेळाडूंसाठी खूप महत्त्वाची असते. या स्पर्धेत चार दिवसीय सामने खेळवले जातात. तरुण खेळाडूंना रणजी क्रिकेटमधील पदार्पणाआधी या स्पर्धेद्वारे आपली चुणूक दाखवण्याची संधी मिळते. सचिन तेंडुलकर, युवराज सिंहसारखे क्रिकेटपटू या स्पर्धेतूनच नावारुपाला आले होते.

### चाहत्यांना आवडलेलं नाही

युवराज सिंह याने २००० साली खेळवण्यात आलेल्या कूच बिहार चषक स्पर्धेत ३५८ धावांची खेळी साकारली होती. २३ वर्षांनंतर कर्नाटकच्या प्रखर चतुर्वेदीने मोडित काढला. कूच बिहार चषकाच्या अंतिम सामन्यात कर्नाटकचा सलामीवर प्रखर चतुर्वेदी याने मुंबईविरोधात नाबाद ४०४ धावांची खेळी साकारली आहे.